# साहित्य : जीवनगौरव पुरस्कार मनोगत : जयंत नारळीकर



गंगा नदीच्या तीरावर आणि ग्रँटा नदीच्या काठावर म्हणजे बनारस हिंदू विश्वविद्यालय आणि केंब्रिज युनिव्हर्सिटी या दोन ठिकाणी तारुण्यातील जडणघडण व शिक्षण झालेल्या जयंत नारळीकर यांनी फ्रेड हॉएल यांच्यासोबत विश्वरचना शास्त्रातील सिद्धांत मांडला. वयाच्या पस्तिशीनंतर भारतात आल्यावर त्यांनी टीआयएफआर (मुंबई) आणि आयुका (पुणे) या दोन ठिकाणी खगोलशास्त्र व खगोलभौतिकी या विज्ञानशाखांत संशोधन व अध्यापन केले, पण त्याचबरोबर व्याख्याने व लेखन या माध्यमांतून त्यांनी केलेले विज्ञानप्रसाराचे कार्य लक्षणीय आहे. 'विज्ञान व वैज्ञानिक', 'आकाशासी जडले नाते' इत्यादी पुस्तकांद्वारे त्यांनी सर्वसामान्य वाचक व विद्यार्थी यांच्या मनात विज्ञानाची गोडी निर्माण केली आणि विज्ञानकथा व विज्ञानकादंबऱ्या लिहून मराठीतील विज्ञान साहित्याला प्रतिष्ठा मिळवून दिली. 'यक्षांची देणगी', 'अंतराळातील भस्मासुर', 'टाइम मशीनची किमया', 'सूर्याचा प्रकोप' हे चार विज्ञानकथा संग्रह आणि 'प्रेषित', 'व्हायरस', 'अभयारण्य', 'अंतराळातील स्फोट', 'वामन परत न आला' या पाच विज्ञान कादंबऱ्या लिहून नारळीकरांनी मराठीतील विज्ञानसाहित्याचे दालन समृद्ध केले.

**मी** आजवर कामासाठी आणि त्या निमित्ताने स्थलदर्शनासाठी सुमारे ५० देशांत भ्रमंती केली. नव्या ठिकाणी आपण ठराविक मुदतीसाठी जातो, तेव्हा आपल्या डोळ्यांपुढे अनेक उद्दिष्टे असतात. अमुक अमुक कामे उरकायची, तमुक प्रेक्षणीय स्थळे पाहायची; यादीवरच्या लोकांना भेटायचे, वगैरे वगैरे. प्रथम-प्रथम वाटते, आपण ज्या मुदतीसाठी येथे आलोय ती मुदत या सर्व उद्दिष्टांसाठी भरपूर आहे. त्यामुळे सावकाश आपण ती उद्दिष्टे 'उरकायला' सुरुवात करतो. पण दिवसांमागून दिवस जातात, कसे जातात ते कळत नाही. आणि मग जाणवायला लागते की मुदत संपत आली! सुरुवातीला ठरलेली सर्व उद्दिष्टे पूर्ण होणार नाहीत. मग आपण म्हणतो 'ह्या गोष्टी आपण पुढच्या भेटीत उरकू.'

आयुष्याचे काहीसे असेच असते. सुरुवातीच्या ऐन उमेदीच्या काळात आपण अमुक करणार, तमुक मिळवणार असे मोठे मनसुबे रचतो. निवडलेल्या कामात किती यश मिळवायचे याच्या महत्त्वाकांक्षा असतात. पुढे जाऊन ४०-५०-६० वर्षांचे उर्वरित आयुष्य आहे, त्यात हा 'अजेंडा' आपण पूर्ण करू, असा आत्मविश्वास असतो. त्यांतील काही गोष्टी साध्य होतातही. पण निवृत्तीकाळ आल्यावर जाणीव होते, की मुदत संपत आली. फरक इतकाच की इथे 'पुढल्या भेटी'ची शक्यता नसते.

हे मनोगत लिहीत असताना मी त्या स्थितीला येऊन पोचलो आहे. अशा वेळी मागे वळून पहावेसे वाटते की, आपले आजवरचे आयुष्य सफल व समाधानकारक मानायचे का? आपण ते वेगळेपणाने जगलो असतो, तर अधिक यश मिळाले असते का?

आयुष्य पुन्हा पहिल्यापासून जगायला मिळाले, तर काही वेगळा मार्ग निवडाल का, हा प्रश्न पुष्कळांना विचारला जातो. माझ्या बाबतीत याचे ठाम उत्तर 'नाही' असे आहे. वैज्ञानिक संशोधन क्षेत्रात आणि जनसामान्यां-साठी विज्ञान प्रसार या दोनही बाबतीत मला कृतीचे समाधान लाभले आहे. वैज्ञानिक संशोधक म्हणून मी केंब्रिज, मुंबई आणि पुणे येथे प्रख्यात संस्थांत काम केले. पण मला सतत याची जाणीव होती की संशोधन हा माझा छंद आहे, माझ्या आवडीचा विषय आहे. छंद जोपासण्यातच आपल्याला उदरनिर्वाहाचे साधन मिळावे, याहून अधिक सुखदायी काय असू शकेल?

माझे गुरू फ्रेड हॉएल यांच्याप्रमाणे मी संशोधनाचा निवडलेला मार्ग काटेरी आहे, प्रस्थापित कल्पनांना आव्हान देत-देत तो पुढे जातो. प्रस्थापित कल्पनांचा पुरस्कार करणारे संशोधन मी हाती घेतले असते, तर हा मार्ग नक्कीच सोपा, आखीव व कमी विघ्नांचा झाला असता. माझ्या संशोधनाचे मूल्यमापन होऊन मला अनेक पुरस्कार मिळाले, आयएयू कमिशनच्या सभापतीपदाचा मान मिळाला, पण काही काही मानसन्मान हुलकावणी देऊन गेले, ज्यांच्यासाठी प्रस्थापित संशोधनाचाच शिक्का असावा लागतो. परंतु याबद्दल मला यत्किंचितही खंत नाही. केवळ 'महाजनो येन गत: स पंथा:' असे म्हणत प्रस्थापित कल्पनांचा पुरस्कार करणाऱ्या हजारांपैकी एक होण्याचे आकर्षण मला पूर्वी नव्हते, आजही नाही.

माझे पीएच.डी.चे विद्यार्थी पदवीपूर्वीच्या संशोधनात प्रस्थापित नसलेल्या विषयावर काम करत, पण पुढील संशोधनासाठी त्यांनी प्रस्थापित मार्गच निवडला. त्या वेळी मी त्यांना कसलाही विरोध केला नाही; पण निदान एकाने तरी नवा मार्ग निवडायला हवा होता, असे आज वाटते.

# समाजाला **विज्ञानाभिमुख** करण्याची गरज

मी फ्रेड हॉएल यांचे उदाहरण डोळ्यांपुढे ठेवून
विज्ञानकथा / कादंबऱ्या लिहिण्याच्या फंदात पडलो.
याचे कारण विज्ञान जनसामान्यांपर्यंत पोचवण्याचे ते एक उत्कृष्ट साधन आहे.
मराठी साहित्यात उत्कृष्टतेचा शिक्का असलेले असे वाङ्मय थोडेच आहे.
पण विज्ञान आणि समाज यांच्या परस्परसंबंधांना कथा माध्यमातून व्यक्त करणे
ही काळाची गरज आहे. मराठी साहित्याचे हे नवे दालन अधिक समृद्ध व्हावे,
ही अपेक्षा व्यक्त करून हे मनोगत संपवतो.

मी निवडलेला विश्वरचनाशास्त्राचा विषय असा आहे, जिथे विज्ञानाच्या वस्तुनिष्ठतेच्या भिंती ओलांडून स्वत:ची मते त्यात घालण्याचा मोह वैज्ञानिकाला सुटत नाही. ही मते वस्तुस्थिती, वास्तविकता, पुरावे आदींपेक्षा संस्कृतिजन्य असतात. उदाहरणार्थ, विश्वाची उत्पत्ती एका विशिष्ट वेळी झाली असे सांगणारे मध्यपूर्वेत जन्मलेले तीनही धर्म बहुतांश वैज्ञानिकांच्या मानसिकतेवर खोलवर परिणाम टाकून आहेत, त्यांतील काही वैज्ञानिकांनी स्वत: निधर्मी असल्याचा दावा केला असला तरी! त्यामुळे हॉएल आणि मी दोघांनी पुरस्कार केलेल्या 'अनादि' विश्वाच्या कल्पनेला विरोध होतो. पण प्रत्यक्षात प्रस्थापित सिद्धान्ताच्या विरोधात असलेले पुरावे दुर्लक्षिले तरी जातात किंवा त्यांची कारणमीमांसा करायला त्या सिद्धांताला नव्या गृहीतकाचे ठिगळ लावले जाते.

या संदर्भात २००० हून जास्त वर्षांपूर्वीचा एक किस्सा आजच्या परिस्थितीला चपखल लागू होतो. पायथॅगोरसच्या अनुयायांच्या मते, पृथ्वी सूर्याभोवती फिरत नसून एका केंद्रीय अग्नीभोवती फिरते. अशा मताला विरोध करणाऱ्यांनी विचारले, ''तो केंद्रीय अग्नी आपल्याला दिसत का नाही?'' यावर पायथॅगोरस उत्तरले, ''कारण पृथ्वी आणि अग्नीच्या दरम्यान एक 'प्रतिपृथ्वी' देखील त्या अग्नीभोवती फिरते. ही प्रतिपृथ्वी मधे आल्याने आपल्याला अग्नी दिसत नाही.'' त्यावर विरोधकांनी प्रश्न केला, ''मग ही प्रतिपृथ्वी का दिसत नाही?'' यावर त्यांना उत्तर मिळाले, ''कारण आपल्या पृथ्वीवर ग्रीस देश तिच्या उलट बाजूला आहे.'' थोडक्यात, प्रत्यक्ष पुराव्यापासून आपला सिद्धान्त वाचवण्यासाठी नव्या गृहीतकांची कसरत करावी लागली.

आज हा किस्सा वाचून त्या वेळची परिस्थिती किती हास्यास्पद होती असे आपण म्हणू. पण दुर्दैवाने आजच्या प्रस्थापित महास्फोटनिर्मित विश्वाच्या सिद्धान्ताला टिकवून धरण्यासाठी प्रतिपृथ्वी सदृश्य सहा-सात गृहीतके स्वीकारावी लागतात, ज्यांना कसलाही प्रत्यक्ष पुरावा उपलब्ध नाही. मग हे अवडंबर का टिकून आहे? याचे एक महत्त्वाचे कारण आहे, (धार्मिक संस्कृतीचा आधीचा मुद्दा वगळता) संशोधनाला उपलब्ध मुबलक पैसा. पैशापाठोपाठ संशोधनाच्या सुखसोयी, आणि त्यांच्याशी जोडलेला अधिकार. हे टिकवून धरायला तुमचे सिद्धान्त बरोबर आहेत, हे पैसा पुरवणाऱ्यांना (बहुतांशी सरकारी समित्यांना) पटले पाहिजे. या 'मोहा'पायी, आहे तो सिद्धान्त टिकवण्याचे प्रयत्न असतात.

त्यामुळे आता माझे मत होत चालले आहे, की विश्वरचनाशास्त्र हा विषय आज वैज्ञानिक राहिलेला नसून त्यात अवैज्ञानिक अटकळबाजी वाढत चालली आहे. १९६० मध्ये मी या विषयात शिरलो, कारण तेव्हा त्यातील वैज्ञानिक आव्हाने मला आकर्षक वाटली होती. आजची अवैज्ञानिक अटकळबाजी पाहून, असे वाटते की, मी आज संशोधनाच्या उंबरठ्यावरील तरुण शास्त्रज्ञ असतो तर या विषयात शिरलो नसतो. एका विषयात दीर्घकाल संशोधनाचा आनंद घेतल्यावर असे मत व्यक्त करणे हा विरोधाभास नसून, गेल्या १०-१५ वर्षांत बदललेल्या परिस्थितीचे सूचन आहे.

विज्ञान-तंत्रज्ञानाचा मानवी जीवनावर वाढता प्रभाव पाहता समाज आणि विज्ञान यांच्यातली दरी कमी करायची गरज आहे. म्हणून विविध माध्यमांतून समाजाला विज्ञानाभिमुख करणे आवश्यक आहे. त्यासाठी पत्रकार, लेखक, शिक्षक, सिने-दिग्दर्शक आदींच्याबरोबर वैज्ञानिकांनी पुढे सरसावले पाहिजे. 'आम्ही विज्ञान निर्मिती करू..., विज्ञानप्रसार इतरांनी करावा' असे म्हणत हात झटकून बाजूला व्हायची ही वेळ नव्हे. कारण ज्या जनताजनार्दनाने भरलेल्या करातून वैज्ञानिकांना संशोधनासाठी पाठबळ मिळते, त्याचे ते देणे लागत नाहीत काय? मला वाटते, स्वयंसेवी विज्ञानप्रसारक संस्थांच्या खांद्याला खांदा लावून राष्ट्रीय वैज्ञानिक संस्थांनी या क्षेत्रात उतरण्याची गरज आहे. अशा कार्यातूनच शास्त्रज्ञांच्या मूल्यमापनात भर पडेल आणि हे जर अधिकृतरित्या मान्य झाले, तर अधिक संख्येने शास्त्रज्ञ या क्षेत्रात उतरतील.

विज्ञान तंत्रज्ञानाची घोडदौड चालू आहे, पण त्याचबरोबर अंधश्रद्धाही फोफावत आहेत. फलज्योतिष, वास्तुशास्त्र, बुवाबाजीसारख्या गोष्टींमागे धावणारे लोक केवळ अशिक्षित खेडूत नसून, शहरातले व शिकले सवरलेले संपन्न नागरिकही आहेत. असे का व्हावे? याचे कारण, जीवनाची क्लिष्टता वाढली आहे, अनेक महत्त्वाच्या निर्णयाची संख्या वाढते आहे... अशा परिस्थितीत मानसिकता दुबळी होते आणि स्वत: निर्णय घ्यायची जबाबदारी टाळून अंधश्रद्धेवर विसंबण्याची प्रवृत्ती निर्माण होते. अशा प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी विज्ञानप्रसाराबरोबर वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणेही महत्त्वाचे आहे.

शेवटची पण कमी महत्त्वाची नाही, अशी एक बाब! मी फ्रेड हॉएल यांचे उदाहरण डोळ्यांपुढे ठेवून विज्ञानकथा/कादंबऱ्या लिहिण्याच्या फंदात पडलो. याचे कारण विज्ञान जनसामान्यांपर्यंत पोचवण्याचे ते एक उत्कृष्ट साधन आहे. मराठी साहित्यात उत्कृष्टतेचा शिक्का असलेले असे वाङ्मय थोडेच आहे. पण विज्ञान आणि समाज यांच्या परस्पर संबंधांना कथा माध्यमातून व्यक्त करणे ही काळाची गरज आहे. मराठी साहित्याचे हे नवे दालन अधिक समृद्ध व्हावे, ही अपेक्षा व्यक्त करून हे मनोगत संपवतो.

**- जयंत नारळीकर**
आयुका, पुणे विद्यापीठ परिसर,
पुणे ४११००७.

## ओळख । अ. पां. देशपांडे

**आ**जवर डॉ.जयंत नारळीकरांचे देशी-परदेशी शेकडो सत्कार झाले. पण ते सर्वच्या सर्व त्यांच्या खगोलभौतिकी क्षेत्रातील कामगिरीसाठी. पण आजचा महाराष्ट्र फाऊंडेशनचा सत्कार मात्र त्यांच्या ललित-विज्ञान लेखनासाठीच आहे.

प्रा. फ्रेड हॉयल यांच्या मार्गदर्शनाखाली नारळीकरांनी केवळ पीएच.डीचे संशोधनच केले असे नाही; तर त्यांच्यातील ललित-विज्ञान लेखनाचा गुणही घेतला. स्वत: फ्रेड हॉईल यांनी अनेक विज्ञानकथा, टीव्ही मालिका लिहिल्या आहेत. नारळीकरांनी त्यांच्यापासूनच ललितविज्ञान लेखनाची स्फूर्ती घेतली.

नारळीकर १९७३ सालच्या जालना येथे भरलेल्या मराठी विज्ञान संमेलनाचे अध्यक्ष होते. त्यावर्षीच्या विज्ञानरंजन कथा स्पर्धेतील विजेत्यांना त्यांच्या हस्ते पारितोषिके दिली गेली. ही पारितोषिके वितरीत करीत असतानाच त्यांच्या मनात पुढच्या वर्षी आपणही या स्पर्धेत भाग घ्यावा असा स्फुल्लिंग पडला असणार! कारण त्यांनी १९७४ सालच्या स्पर्धेत भाग घेऊन 'कृष्णविवर' नावाची कथा पाठवली. पण त्यासाठी नाव घेतले, 'नारायण विनायक जगताप'. स्वत:च्या नावाची आद्याक्षरे उलट्या क्रमाने लिहून. जयंत विष्णू नारळीकर म्हणजे जविना, त्याऐवजी नाविज. आणि आदल्या वर्षीचे अध्यक्षीय भाषण स्वत:च्या हस्ताक्षरात मराठी विज्ञान परिषदेला पाठविले असल्याने ते ओळखून परीक्षकांवर दडपण येऊ नये, म्हणून विज्ञानकथा त्यांच्या पत्नी डॉ.मंगला नारळीकरांच्या हस्ताक्षरात पाठवली. आणि त्या कथेला पाहिले पारितोषिक मिळाले. तसे ते कथालेखक श्री.नारायण विनायक जगताप यांना कळविल्यावर नारळीकर बुरख्यातून बाहेर आले. मौज प्रकाशनाकडून १९७९ साली प्रकाशित होणाऱ्या त्यांच्या 'यक्षांची देणगी' या कथासंग्रहात ही कथा समाविष्ट करायची होती, म्हणून त्यांनी पत्र लिहून मराठी विज्ञान परिषदेकडे परवानगी मागितली होती. नारळीकरांच्या ललित लेखनाची सुरुवात अशी झाली. त्यानंतर ते मराठीतील विविध मासिकांत कथा लिहू लागले. 'यक्षांची देणगी'च्या प्रस्तावनेत नारळीकरांनी त्यांची विज्ञानकथा लेखनामागची भूमिका स्पष्ट केली आहे.

''विज्ञानाची माहिती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा प्रचार आवश्यक आहे. त्यासाठी लेख, भाषणे, वर्तमानपत्रे, रेडिओ, टीव्ही अशांसारखी अनेक माध्यमे उपलब्ध आहेत. पण दुर्दैवाने ह्या बाबतीत वैज्ञानिकांत एक प्रकारची उदासीनता दिसून येते. हे काम कमीपणाचे आहे असेही बऱ्याच वैज्ञानिकांना वाटते. खुद्द आईन्स्टाइनने आपली 'रिलेटीव्हिटी' इतरांना समजावी ह्यासाठी सोप्या शब्दांत पुस्तके लिहिली आणि भाषणे दिली. एडिंग्टन, जेम्स जीन्स या खगोलशास्त्रज्ञांनी असाच प्रयत्न केला. इतर विषयांतील नामवंत शास्त्रज्ञांनीही असे प्रयत्न केले आहेत. फ्रेड हॉएल यांनाही यात कमीपणा वाटत नाही. माझ्या मते विज्ञानकथा या तंत्राचा ह्या कामासाठी बराच उपयोग होईल. विष्णुशर्म्यांने पंचतंत्रात गोष्टीचे माध्यम वापरून मुलांना शास्त्रनिपुण केले. विज्ञानाची गोळी जर कडू वाटत असेल तर त्याला कथेच्या रूपातील साखरेचे 'कोटिंग' द्यावे. मी तरी अशा उद्देशाने विज्ञानकथा लिहितो.''

विज्ञानकथा कशा असाव्यात ह्याचे उत्तर त्या कोणत्या

# नारळीकरांनी विज्ञानकथेला **आधुनिक** बनवले

**नारळीकर १९७४ सालापासून गेली ३८ वर्षे अखंडपणे विज्ञानकथा आणि विज्ञानकादंबऱ्या लिहीत आहेत. या काळात त्यांचे 'यक्षांची देणगी', 'अंतराळातील भस्मासूर', 'टाइम मशीनची किमया' आणि 'सूर्याचा प्रकोप' हे चार विज्ञानकथा संग्रह प्रकाशित झाले तर 'प्रेषित', 'वामन परत न आला', 'अंतराळातील स्फोट', 'व्हायरस' आणि 'अभयारण्य' या पाच कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. हे सर्व त्यांनी त्यांचे संशोधन, आंतरराष्ट्रीय व्याख्यानांचे दौरे, आयुका संस्थेची उभारणी व तिचे संचालकपद, प्रसंगोपात लेखन आणि भारतभर भाषणांच्या निमित्ताने केलेले अनेक दौरे सांभाळून केले, हे पाहिल्यावर अचंबा वाटतो.**


उद्देशाने लिहिल्या आहेत यात सापडते. मराठी साहित्यात या तंत्राचा विकास झाला नाही. इंग्रजीमध्ये ज्यूल व्हर्न, एच.जी.वेल्स यांनी सुरू केलेल्या परंपरेला अनेकांनी हातभार लावला आहे. विज्ञानकथा मनोरंजक आणि उद्बोधक असावी. सध्या माहीत असलेल्या विज्ञानावर किंवा स्वत:च्या कल्पनाशक्तीने भर घालून उद्याच्या विज्ञानाचे चित्र रेखाटण्याचा त्यात प्रयत्न असावा. आर्थर क्लार्कने टेलिव्हिजन प्रक्षेपणाची कल्पना मांडली, ती आता प्रत्यक्षात उतरली आहे. फ्रेड हॉएल यांनी 'द ब्लॅक क्लाऊड' या पहिल्या विज्ञानकादंबरीत ताऱ्यांच्या दरम्यान कृष्णमेघ असल्याची कल्पना १९५६ च्या सुमारास केली होती. नंतर १९६० ते ७० च्या दरम्यान जीवनाचे मूलघटक म्हणून समजले जाणारे रासायनिक रेणू सापडले, मात्र विज्ञानकथा लेखकाची कल्पना नेहमीच सफल झाली असे नाही.

नारळीकरांनी आपल्या काही कथांत विज्ञान समजावून देण्यासाठी आकृत्यांचा वापर केला आहे. उदा. 'उजव्या सोंडेचा गणपती' या कथेत मोबियसची पट्टी समजण्यासाठी आकृत्या छापल्या आहेत. 'धोंडू' कथेत त्यांनी आलेख काढले होते. आणि 'यक्षांची देणगी' या कथासंग्रहाला एक परिशिष्ट जोडून प्रत्येक कथेमागची वैज्ञानिक कल्पना स्पष्ट केली आहे. म्हणजे ती कथेतून पुरेशी स्पष्ट होत नसावी म्हणून त्यांनी हे परिशिष्ट लिहिले का? वाचकांना नीट समजावे म्हणून कदाचित त्यांच्यातील शिक्षक जागा झाला असणार. तसे परिशिष्ट 'टाइम मशीनची किमया' या पुस्तकातही आहे. संशोधनात्मक प्रबंध, मागोवा घेणारा लेख, वैज्ञानिक मुद्द्याची चर्चा करणारा लेख, विज्ञानकोश, सुशिक्षितांसाठी लिहिलेला लेख आणि विज्ञानकथा या सहा प्रकारांत त्याच क्रमाक्रमाने विज्ञानाचे प्रमाण कमी कमी होत जाते आणि त्या त्या प्रमाणात माध्यमाचे महत्त्व वाढत जाते. उदा. विज्ञानकथेत कथेचे महत्त्व वाढत जाते आणि त्यासाठी जास्त मेहनत करावी लागते.

एखादी विज्ञानकथा अतिविशाल, चमत्कृतीपूर्ण अथवा काहीशा अनाकलनीय घटनेवर आधारलेली असेल तर त्याचा संबंध वाचकाला माहीत असलेल्या पार्श्वभूमीशी जोडल्याखेरीज त्या मनोवेधक ठरत नाहीत. 'महाराष्ट्र टाइम्स'च्या १९७९च्या वार्षिक अंकात नारळीकरांनी 'स्फोट' नावाची विज्ञानकथा लिहिली तेव्हा त्यांना या गोष्टीची जाणीव झाली. ''पृथ्वीवर एखादा सुपरनोव्हा उद्भवला तर किती हाहाकार उडेल या विषयावर ती कथा नारळीकरांनी बेतली आहे. विज्ञानकथानक कितीही फुलवले तरी ते वैज्ञानिक तथ्याची कास सोडून असू नये. उदा. प्रकाशाची वेगमर्यादा ओलांडता येत नाही हे गृहीत धरल्यावर 'प्रेषित' ही विज्ञानकादंबरी लिहिताना नारळीकरांवर काही बंधने आपोआप आली. आपल्या साहित्याकडे विज्ञानसाहित्य म्हणून बघितले जावे असे वाटत असेल तर लेखकाने प्रस्थापित विज्ञानाचा पायाच वापरला पाहिजे. हा निकष लावला तर विज्ञानकथा आणि परीकथा किंवा निव्वळ फँटसी यांच्यातला फरक कळून येतो. उदाहरणार्थ, भयकथा म्हणजे विज्ञानकथा असे म्हणता येणार नाही. विज्ञानाची चांगली माहिती असणे हे जरी उत्तम विज्ञानकथेकरिता आवश्यक असले तरी पुरेसे नसते. कथानक रंगवण्यासाठी जरुरी असणारे इतर गुण त्याच्यात पाहिजे. उदा. सस्पेंस हा प्रकार पुष्कळ विज्ञानकथा रंगवण्यासाठी उपयोगी पडतो, पण हा प्रकार सगळ्यांनाच जमतो असे नाही.


विज्ञान हे जिज्ञासेतून निर्माण झाले आहे. त्यामुळे अनेक अनाकलनीय गोष्टी समजायला मदत झाली आहे. उदा.सूर्याच्या आंतरिक समतोलात सूक्ष्म असा बदल झाला आणि त्याचे तापमान थोडे जरी खाली आले तरी पृथ्वीवर हिमयुग येऊ शकेल, किंवा जेनेटिक इंजिनिअरिंग या विषयात सध्या जे प्रयोग चालले आहेत तशासारखे प्रयोग, अशा विज्ञानाचा पाया माहीत नसेल, तर अशा कथा या भयकथा होऊ शकतात. आणि सगळ्यांनाच नेमकी विज्ञानकथा ठाऊक नसल्याने अनेक भयकथांची गणना विज्ञानकथेत मग होते. वाचकाला विज्ञाननिष्ठ करावे हा विज्ञानसाहित्याचा हेतू असेल तर तो अशा भयकथांनी साध्य न होता वाचकाला अंधश्रद्धेकडे ढकलतो. विज्ञानकथेत सांगितलेली विज्ञानाची संकल्पना कथानकाच्या ओघाओघात आली पाहिजे. तशी ती 'राऊंड दी वर्ल्ड इन एटी डेज' या कादंबरीत आली आहे. लेखक ती समजावून देण्याच्या भानगडीत पडला तर मात्र ती केवळ लेक्चरबाजी ठरेल. विज्ञानकथेतील पात्रांना सजीव करणे आवश्यक आहे. कितीही मोठा शास्त्रज्ञ असला तरी तो मुळात तुमच्या आमच्यासारखा माणूस आहे हे वाचकाला पटले पाहिजे. किंबहुना वाचकाने त्याच्याशी तादात्म्य पावले पाहिजे.

१९७६ मध्ये नारळीकरांनी 'धूमकेतू' नावाची एक विज्ञानकथा लिहिली होती. त्यात पृथ्वीची एका धूमकेतूशी टक्कर होण्याची शक्यता वर्तवली होती. त्यातून पृथ्वी व पृथ्वीवासियांना कसे वाचवायचे? मग जागतिक स्तरावरील शास्त्रज्ञ एकत्र येऊन त्या धूमकेतूवर अण्वस्त्र धाडायची कल्पना मांडतात. त्यांनी तसे केल्यावर धूमकेतूची दिशा बदलते व पृथ्वीवरील अरिष्ट टळते. त्यानंतर १२-१३ वर्षांनी नासापुढे असाच प्रश्न आला आणि त्यांनी योजलेला उपाय नारळीकरांच्या गोष्टीत सुचविल्याप्रमाणेच होता. १९७५-७७ दरम्यान नारळीकरांनी लिहिलेल्या 'पुत्रवती भव' कथेत लिंग तपासणीचे धोके वर्णन केले आहेत. ते आज नेमके अनुभवायला मिळत आहेत. ज्या विज्ञानकथेत तर्कशून्य विधाने केलेली असतात किंवा कथेची लेखनशैली










वाईट असते किंवा स्वभावचित्रे अपूर्ण असतात त्या विज्ञानकथा निकृष्ट समजाव्यात असेही मत नारळीकर एके ठिकाणी मांडतात.

विज्ञानकथेचे खऱ्या अर्थाने आजवर समीक्षण झाले नाही असे जेव्हा सर्व विज्ञान कथाकार म्हणतात, तेव्हा मराठी वाङ्मयातील समीक्षक या वाङ्मय प्रकाराची दखल घेत नाहीत अशी त्यांची खरी तक्रार असते. पण विज्ञानकथेत कथा आणि विज्ञान असे दोन्ही असते आणि यातील विज्ञान समजत नाही म्हणून ते याची दखल घेत नाहीत. त्यामुळे जे वैज्ञानिक मराठी वाङ्मयाचे रसिक आहेत, उत्तम वाचक आहेत, त्यांनी विज्ञानकथेची समीक्षा करायला हवी; अथवा विज्ञानकथाकारांनी ती जबाबदारी स्वीकारायला हवी.

नारळीकरांना २००५ साली 'चतुरंग प्रतिष्ठान'ने जीवनगौरव पुरस्कार दिला. त्यानिमित्त जी स्मरणिका प्रकाशित झाली त्यामध्ये नारळीकरांच्या कथांवर डॉ.बाळ फोंडके यांनी एक लेख लिहिला आहे. त्यात ते म्हणतात, ''नारळीकरांपूर्वीही मराठी विज्ञान परिषद विज्ञानरंजनकथा स्पर्धा घेत होतीच आणि मराठीत विज्ञानकथा लिहिली जात होतीच; पण या क्षेत्राला नारळीकरांच्या आगमनामुळे एक प्रतिष्ठा प्राप्त झाली. एक जगप्रसिद्ध वैज्ञानिक विज्ञानकथा लिहीत आहेत याचे स्वागत दुर्गाबाई भागवत यांनी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून केले. मुकुंदराव किर्लोस्करांनी त्यानंतर 'किर्लोस्कर' मासिकातून त्यांच्या कथा छापल्या. पण त्यांच्या वैज्ञानिक कर्तृत्वाचे वलय कथेला लाभले असे नसून त्यांनी खऱ्या अर्थाने मराठी विज्ञानकथेला एक नवे परिमाण दिले. नारळीकरांनी पूर्वी लिहिलेल्या विज्ञानकथा चमत्कृतीपूर्ण आणि विज्ञानबहुल असल्याची टीका झाली होती. किंबहुना तिची उपेक्षा झाली आणि काहीवेळा बालसाहित्य म्हणूनही तिची संभावना झाली; पण ज्यूल व्हर्न किंवा एच.जी.वेल्स यांच्या कथांचे जे अनुवाद मराठीत केले गेले त्या कथाही मुळात अद्भुतरसाच्याच आहेत. भालबा केळकर, द.पां.खांबेटे यांच्या कथाही परिकथा आणि अद्भुतकथाच होत्या. 'कृष्णविवर', 'उजव्या सोंडेचा गणपती', 'धूमकेतू'सारख्या कथांतून नारळीकरांनी अप्रत्यक्षपणे विज्ञानकथेचे स्वरूप व निकषही प्रस्थापित केले. मराठी कथेला गंगाधर गाडगीळ– पु.भा.भावे–अरविंद गोखले– व्यंकटेश माडगूळकर यांनी नवकथेचे लेणे देऊन आधुनिक बनवले तसे नारळीकरांनी विज्ञानकथेला आधुनिक बनवले.

नारळीकर १९७४ सालापासून गेली ३८ वर्षे अखंडपणे विज्ञानकथा आणि विज्ञानकादंबऱ्या लिहीत आहेत. या काळात त्यांचे 'यक्षांची देणगी', 'अंतराळातील भस्मासूर', 'टाइम मशीनची किमया' आणि 'सूर्याचा प्रकोप' हे चार विज्ञानकथा संग्रह प्रकाशित झाले तर 'प्रेषित', 'वामन परत न आला', 'अंतराळातील स्फोट', 'व्हायरस' आणि 'अभयारण्य' या पाच कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. हे सर्व त्यांनी त्यांचे संशोधन, आंतरराष्ट्रीय व्याख्यानांचे दौरे, आयुका संस्थेची उभारणी व तिचे संचालकपद, प्रसंगोपात लेखन आणि भारतभर भाषणांच्या निमित्ताने केलेले अनेक दौरे सांभाळून केले हे पाहिल्यावर अचंबा वाटतो.

**अ. पां. देशपांडे**
बी–५, जलाराम जोत, वल्लभबाग लेन,
घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०० ०७७,
apd1942@gmail.com
Mob.: 9322247074